# प्रकरण दुसरे

## दुरशिक्षण व मुक्त विद्यापीठ बी. एड्. शिक्षणक्रम

# प्रकरण दुसरे

## दूर शिक्षण व मुक्त विद्यापीठ बी. एड्. अभ्यासक्रम

प्रस्तुत प्रकरणात दूरशिक्षणाची संकल्पना, आवश्यकता, आदानप्रदान, संरचना यांचा सामान्यपणे तर शिक्षक प्रशिक्षण याचा विशेष करून समावेश केलेला आहे. संशोधिकेचा संशोधविषय मुक्त विद्यापीठाशी संबंधित असल्याने शिक्षक प्रशिक्षणाचा या प्रकरणातील दुस-या भागामध्ये समावेश केलेला आहे.

2.1. दूरशिक्षण संकल्पना :

संधीवंचितांना शिक्षण व दूरशिक्षणाची समानता उपलब्ध करून देणारी मुक्त विद्यापीठे म्हणजे अध्यापनाची नवमंदिरे होत. " यावत् जीवम् **अधीते** मनुजः । " मनुष्य जीवनभर शिकत राहण्यासाठी औपचारिक व अनौपचारिक शिक्षणाची गरज आहे. अनौपचारिक शिक्षणाच्या मर्यादा दूर करण्यासाठी व मनुष्याची शिकण्याची क्रिया अखंड राहण्यासाठी अनौपचारिक शिक्षणातून दूरशिक्षणाची योजना कार्यान्वित होते. या संकल्पनेत पत्राद्वारे शिक्षण, समूह संपर्क साधनांद्वारे शिक्षण इत्यादींचा समावेश होतो.

शिक्षण द्विध्रुवात्मक प्रक्रियेमध्ये शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात आंतरक्रिया घडते. परंतु दूरशिक्षणात ही दोन्ही केंद्रे किरकोळ अपवाद वगळता एकमेकांपासून अंतर व परिसराच्या दुष्टीने दूर असतात. मायकेल मूरच्या मते दूर शिक्षण म्हणजे,

"A family of instructional methods, in which teaching behaviours are executed apart from learning behaviour including those which is a continuous situation would be performed in the learner must be faciliated by print, electronic, mechanical or other devices."

Michael Moore - 1972 [1]

म्हणजे दूरशिक्षणाची संकल्पना ही व्यापक स्वरूपाची आहे.

2.2. दूरशिक्षणाची भारतात आवश्यकता :

अ) प्रचंड लोकसंख्या : ( लोकसंख्या - 99,42,28,870 )

प्रचंड लोकसंख्या असलेल्या भारतात आज दि. 29.12.1999 लोकसंख्येचा विस्फोट झालेला आहे. देशाच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास करता एवढया लोकांना औपचारिक शिक्षण देणे शक्य नाही. तसेच एवढया लोकसंख्येतील सर्वच लोक पूर्णवेळ पूर्ण शिक्षण घेऊ शकत नाहीत.

ब) शिक्षणाचा सोयीच्या उपलब्धतेच्या प्रमाणात वाढ असण्याची गरज :

लोकसंख्येच्या प्रस्फोटाबरोबर ज्ञानाचा प्रस्फोट झालेला आहे. तेव्हा ते अद्ययावत ज्ञान सर्व लोकांपर्यंत लवकरात लवकर पोहोचविण्यासाठी गरज निर्माण झाली. सर्वच क्षेत्रातील प्रगती समाजासाठी व ज्ञानाच्या प्रस्फोटाला सामोरे जाण्यासाठी शिक्षण देण्याची गरज निर्माण झाली आहे.

क) गरीबी :

शैक्षणिक व्यवस्थापकांच्या लक्षात आले की शिक्षणावर केल्या जाणा-या खर्चाचा सर्वाधिक भाग हा दारिद्रयरेषेच्या वरच्या लोकांवर केला जात आहे. म्हणून संपूर्ण जनसंख्येपैकी एक तृतीयांशपेक्षा

जास्त लोकांना शिक्षणाची गरज आहे. तसेच भटक्या विमुक्त लोकांचे शोषण थांबवणे आवश्यक आहे.

ड) निरक्षरता :

भारतात 52.36 प्रतिशत लोक साक्षर आहेत तर 47.64 प्रतिशत लोक निरक्षर आहेत. त्यांना साक्षर करण्यासाठी दूरशिक्षणाची आवश्यकता आहे.

इ) तंत्रज्ञानातील प्रगती :

तंत्रज्ञानाच्या विकासामुळे कमी वेळात लोकांपर्यंत शिक्षण देण्याची सोय झाली. तंत्रज्ञानाची माहिती व व्यवहारातील उपयोग कसा करावा हे लोकांना समजण्यासाठी दूरशिक्षणाची गरज आहे.

ई) दूरशिक्षणाची समान संधी :

भारत हे लोकशाही व धर्मनिरपेक्ष राष्ट्र आहे. त्यामुळे घटनेनुसार शिक्षणाची समान संधी हवी. परंतु आर्थिक स्थिती चांगली असली तरी गुणवत्तेची गरज असते व गुणवत्ता नसल्याने उच्च शिक्षणापासून वंचित राहिलेल्या लोकांची सोय व्हावी, या दृष्टीने दूरशिक्षणाची गरज भासली.

फ) जीवनाभिमुख शिक्षण :

दैनंदिन जीवनाशी निगडीत व्यवहारोपयोगी शिक्षण हे औपचारिकपणे सर्वांना देणे शक्य नाही, तेव्हा हे शिक्षण दूरशिक्षणाद्वारे देणे सहज शक्य आहे व ते जनतेस आवडीनुसार व सवडीनुसार शिक्षण घेता यावे म्हणून दूरशिक्षणाची गरज आहे.

त) अभ्यासक्रमाची मागणी :

काही अभ्यासक्रमांना फार कमी लोकांकडून मागणी असते. अशा वेळी किंवा जे शैक्षणिक संस्थात उपलब्ध नसतात व नियमित शिकविले जात नाहीत ते अभ्यासक्रम संबंधितांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी दूर शिक्षणाची आहे.

थ) दुर्गम भागातील लोकांना शिक्षण मिळण्यासाठी :

दुर्गम भागातील शिक्षणात खंड पडलेल्या व्यक्तींसाठी दूरशिक्षण हा परीस आहे.

द) लहानपणीच कामाची जबाबदारी पडलेल्या बाल कामगारांना शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी दूरशिक्षण हीच एकमेव गोष्ट आहे.

ध) व्यवसायात परिपक्वता व अपंग व्यक्तींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी दूरशिक्षण ही एकमेव गोष्ट आहे. [2]

शिक्षण ही शिक्षक व विद्यार्थी यांना जोडणारा दुवा असून या दोहोंतील आंतरक्रियेत आदानप्रदान अत्यंत महत्वाचे असते.

2.3. दूरशिक्षणतील आदानप्रदान :

हारोल्ड लॉस वेल्स यांनी दूरशिक्षणातील आदानप्रदान कोष्टकरूपाने दर्शविले आहे. हे सूत्ररूपाने असे असेल.

| | पाय-या | वर्गीकरण | |
|---|---|---|---|
| | ---- | ----- | |
| 1. | पायरी पहिली | नियंत्रित वर्गीकरण ( कोण ) | शिक्षक |
| 2. | पायरी दुसरी | पाठपृथ:करण ( काय ) | अध्ययन ( प्रश्न विचारणे ) |
| 3. | पायरी तिसरी | अध्ययनार्थींचे वर्गीकरण ( कोण ) | विद्यार्थी ( शिकणारे ) |
| 4. | पायरी चौथी | माध्यमाचे वर्गीकरण ( कशा प्रकारे ) | शैक्षणिक साधने (छापील साहित्य) |
| 5. | पायरी पाचवी | परिणामांचे वर्गीकरण (कोणत्या प्रकारे) | शिक्षणामुळे झालेला बदल |

थोडक्यात या पाय-या खालीलप्रमाणे असतील.

Distance Education

1. Who ?
2. Say what ?
3. To whom ?
4. In which channels ?
5. With what effects ? [3]


अशा प्रकारे दूरशिक्षणात शिक्षक आणि विद्यार्थ्यांमध्ये असलेले अंतर हे साधनांच्या साहाय्याने भरून काढले जाते . त्यासाठी समूह संपर्क साधनांचा योग्य उपयोग होऊ शकेल.

म्हणजेच सध्या शिक्षण प्रक्रिया खालील तत्वावर आधारलेली आहे.

" In education, for instance the system is based on the principle of " walking on two legs " is a smaller, formal school and higher education system and a much larger, non-formal pattern under which education is the responsibility of production teams production units and communes. Decentralisation is cimbined with the mobilisation of local effort to ensure that there are schools almost everywhere -- and almost every one, regardless of age or sex, is a student. " [4]

म्हणजे दूर शिक्षण पद्धतीमुळे फार मोठा जनसमुदाय शिक्षकाच्या प्रकाशझोतात येऊ शकतो - म्हणून दूर शिक्षणाची संरचना : अशी असली पाहिजे.

## 2.4 दूरशिक्षणाची संरचना




अशा प्रकारे विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार व गरजानुसार प्रात्यक्षिक काम, दिग्दर्शन त्याचबरोबर चाचण्यांद्वारे मूल्यमापन व प्रत्याभरण करता येते.

2.5. दूरशिक्षणाचे प्रकार.

1. पत्राद्वारे शिक्षण.
2. मुक्त विद्यापीठ प्रणाली.

1. पत्राद्वारे शिक्षण :

पत्राद्वारे शिक्षण म्हणजे छापील साहित्य विद्यार्थ्यांना पाठविले जाते. हे माध्यम औपचारिक शिक्षणाशी निगडीत आहे. येथे अभ्यासक्रम, प्रवेशपात्रता, कालखड, मूल्यमापनाच्या पद्धती सर्व औपचारिक शिक्षणाप्रमाणे आहेत. फक्त अध्ययन अध्यापन समोरासमोर न होता पत्राद्वारे होते.

2. मुक्त विद्यापीठ प्रणाली :

पत्राद्वारा शिक्षणामुळे शिक्षणाचा दर्जा खालावला, पैसा प्राप्तीचे साधन निर्माण झाले असे आक्षेप आल्याने मुक्त विद्यापीठ प्रणाली प्रकर्षाने अस्तित्वात**आली आहे.** 1970 मध्ये इंग्लंड, भारतात 1982 मध्ये हैद्राबाद येथे पहिले मुक्त विद्यापीठ, दिल्ली येथे इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना, महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे कार्यरत आहेत.


" Indira Gandhi National Open University can act as a candle light distantly enlightening the minds of the ignorant people who are deprived of their education and at the same time accepting what the light shows from DISTANCE. " [5]

2.6. मुक्त विद्यापीठ प्रणालीची वैशिष्ट्ये :

1. औपचारिक शिक्षणाच्या बंधनातून मुक्त करणारी आहे.
2. अभ्यासक्रम जीवनाशी निगडीत आहे.
3. प्रत्येक व्यक्तीच्या शिक्षणाच्या गरजांची पूर्तता होते किंवा नाही याकडे लक्ष दिले जाते.
4. काळ, वेळ यांचे बंधन नाही.
5. पाठयक्रम नाविन्यपूर्ण असतो.
6. प्रशिक्षणार्थींचे वय, अभिवृत्ती, आवड इत्यादींना अनुकूल, अप्रत्यक्ष विविध माध्यमातून अध्यापन असते.
7. स्थळ, काळ, वेळाप्रमाणे सर्वांना उपलब्ध, अनेक विषयांची निवड करणे शक्य होते. सर्व दृष्टीने मुक्त शिक्षण.
8. समाजाच्या गरजेनुसार पाठयक्रम बदलतो.
9. **सेवानिवृत्त व्यक्तीसाठीही अभ्यासक्रम उपलब्ध.**
   शिकताशिकता अर्थार्जन करणा-यांसाठी शिक्षणयोजना कार्यान्वित आहे.
11. स्वतःच्या विषयातील सखोल ज्ञान व प्रशिक्षणाची गरज असणा-यांसाठी म्हणजेच मुक्त विद्यापीठातंर्गत विविध माध्यमातून विविध स्तरातील व्यक्तींसाठी शिक्षण योजना कार्यान्वित केली जाते.

2.7. मुक्त विद्यापीठांतर्गत विविध माध्यमांचा समन्दय :

1. बहुमाध्यम दृष्टीकोन : <u>Multi Media Approach :</u>
   मुक्त विद्यापीठातून विविध माध्यमांच्यामार्फत शिक्षण दिले जाते. ते खालील आकृती वरून स्पष्ट होईल.




" बहुमाध्यमे "

मुक्त विद्यापीठ प्रणालीमधून विविध माध्यमातून शिक्षण योजना कार्यान्वित केली जाऊन विविध स्तरातील व्यक्तींसाठी ती उपयुक्त आहे. दूरशिक्षणात असाच समन्वय साधला जातो.

2.8. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ : बी. एड्. अभ्यासक्रम : स्वरूप :

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी. एड्. शिक्षणक्रमाचा हेतू :

1. सेवांतर्गत शिक्षकांच्या व्यावसायिक क्षमतांना बळकटी आणण्याकरिता त्यांच्या अनुभवांची पद्धतशीर मांडणी करणे.
2. स्वनिर्देशित अध्ययनाद्वारे व्यावसायिक विकासास चालना देणे.
3. सेवांतर्गत शिक्षकांना उदगमनासाठी व्यावसायिकदृष्टया अद्ययावत व सज्ज करणे.
4. सर्वमान्य शिक्षणशास्त्रीय तत्वावर आधारित अध्ययन - अध्यापन व मूल्यमापनासाठी आवश्यक क्षमतांचा विकास करणे.

विद्यार्थी वयोगट, आकलनक्षमता, बौद्धिक पात्रता, भौतिक परिसर इत्यादींचा विचार करून अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन करावे हे ओळखण्याची' क्षमता व त्याप्रमाणे कृती करण्याची क्षमता बी. एड्. मुळे विकसित होईल.

5. शैक्षणिक संस्थामध्ये विविध सहशालेय कार्यक्रम आवश्यक आधारकृती आयोजित करण्याची क्षमता विकसित करणे.

शाळेतील सहशालेय व इतर अभ्यासपूरक कार्यक्रम व्यक्तिमत्व विकास, मूल्यसंवर्धन यासाठी असतात. त्याचा मूल्यशिक्षणाशी कशी सांगड घालावी इत्यादी क्षमता बी. एड्. मुळे निर्माण होतात.

6. सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय आणि विशेषत्वे शिक्षणप्रणालीच्या संदर्भात शिक्षकांच्या भूमिकेचे आकलन व गुणग्राहकता शिक्षकांवर बिंबवणे.

शिक्षकांस समाजातील तसेच शिक्षण प्रणालीतील एक महत्वपूर्ण घटक मानले जाते. त्यामुळे त्याच्यावर काही जबाबदा-या येतात. या जबाबदा-या नसून, कार्यभार नसून शिक्षक म्हणून आपले कर्तव्य आहे. ही नवी जाणीव हया प्रशिक्षणामुळे येईल.

7. वाढ व विकास, व्यक्तिगत भेद आणि साम्य तसेच बोधात्मक भावात्मक क्रियात्मक अध्ययनाच्या मानसशास्त्रीय तत्वांचे आकलन विकसित करणे / वृद्धिंगत करणे.

प्रत्येक विद्यार्थी हा शारीरिक, मानसिक व बोधात्मकदृष्टया भिन्न असतो. त्यामुळे त्या प्रत्येकाचे प्रश्नही वेगळे असतात. मानसशास्त्राच्या अभ्यासाने त्यांचे परिपूर्ण ज्ञान होते. विद्यार्थ्यांशी वागण्याच्या आपल्या प्रचलित पद्धतीत बदल होतो.

थोडक्यात, या बी. एड्. शिक्षणक्रमाच्या आधारे दैनंदिन अध्यापनक्षमता शास्त्रीय दृष्टीने अधिक परिणामकारक व योग्य पद्धतीने करता येईल, नवी दृष्टी निर्माण होईल. [7]

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेने शिक्षणशास्त्राच्या राज्य सल्लागार समितीच्या व एका पाठयक्रम विकसन समितीच्या सहकार्याने शिक्षणशास्त्र पदवी पाठयक्रमाचा आराखडा तयार केला. हा पाठयक्रम राज्यातील पाचवी ते बारावी पर्यंतच्या वर्गांना शिकविणारे प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील अध्यापक यांची प्रशिक्षणाची गरज सेवांतर्गत पद्धतीने भागविणारा आहे. एरवी अशा हजारो शिक्षकांना एका वर्षाची रजा काढून प्रशिक्षण घेणे शक्य झाले नसते. मुक्त विद्यापीठाच्या या पाठयक्रमात प्रशिक्षणाच्या गुणवत्तेबाबत व दर्जाबाबत कोणतीही तडजोड करण्यात आलेली नाही असे म्हटले आहे. तो पूर्ण वेळ बी. एड्. पेक्षा अधिक कालावधीचा आहे. त्यात दूर शिक्षणाचा अभिनव पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. [8]

या प्रशिक्षण कार्यक्रमात सैद्धांतिक भाग व प्रात्यक्षिक भाग असे दोन स्वतंत्र भाग आहेत. या दोन्ही विभागामध्ये नवी कौशल्ये, नव्या पद्धती, नवे कार्यक्रमांचे आयोजन इत्यादी अनुभव मार्गदर्शनाखाली दिले जातात व ते शास्त्रशुद्ध किंवा पद्धतशीरदृष्टया विद्यार्थ्यांना कसे द्यावेत याचे प्रशिक्षण प्रामुख्याने संपर्कसत्रांमध्ये दिले जाते. मुक्त विद्यापीठाने पुरविलेल्या वेगवेगळया विषयांच्या अध्ययन पुस्तिकांखेरीज अभ्यासकेंद्रावर ध्वनिफिती, चित्रफितींचा वापर करण्याची संधी प्रशिक्षणार्थींना मिळते. पाठयक्रमाचे माध्यम मराठी आहे.

2.9. मुक्त विद्यापीठाचे शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाचे वेगळेपण :

हे वेगळेपण कुलगुरू श्री. राम ताकवले यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले आहे.

1. प्राथमिक व माध्यमिक स्तरावर काम करणा-या, नोकरी करणा-या, पी. टी. सी., डी. एड्. व बी. ए. झालेल्या शिक्षकांना नोकरीत राहून व्यवसायिक विकास साधून अधिक चांगले कार्यक्षम शिक्षक बनता येईल.
2. स्वनिर्देशित व्यावसायिक विकास : स्वतःचा व्यावसायिक विकास करण्यासाठी आवश्यक असणारे कौशल्य व क्षमतांचा विकास होण्यासाठी आवश्यक ते सर्व शैक्षणिक अनुभव व सुविधा मुक्त विद्यापीठाकडून उपलब्ध करून दिल्या जातात.

3. वास्तव परिस्थितीचा प्रशिक्षणासाठी उपयोग :

सुट्टीच्या काळात अभ्यासकेंद्रावर संपर्कसत्रे आयोजित केली जातात. प्राध्यापकांच्या मागदर्शनाखाली वास्तव परिस्थिती निर्माण करून नवनवीन अध्ययन - अध्यापन तंत्राचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण दिले जाते.

4. तात्विक माहिती व प्रशिक्षणाचा दर्जा भरून काढण्याचा प्रयत्न :

बी. एड्. शिक्षणक्रमामध्ये सैद्धांतिक व प्रात्यक्षिक भाग यांचा समावेश असतो.

अ) सैद्धांतिक भाग : पाच पाठयक्रमांचा समावेश असून यावर आधारित विद्यापीठाची अंतिम परीक्षा असते.

ब) प्रात्यक्षिक भाग : सैद्धांतिक भागाचा दैनंदिन अध्यापनात वापर करता यावा यासाठी प्रात्यक्षिक कार्ये करावी लागतात. प्रात्यक्षिक कार्याची योग्य कार्यवाही होण्यासाठी एक कार्यपुस्तिका तयार केली आहे.

5. विविध मितीवर आधारित **प्रशिक्षण कार्यक्रम** :

मुक्त विद्यापीठाचा प्रशिक्षण कार्यक्रम विविध मितींवर आधारित आहे. या विविध मितींमध्ये सैद्धांतिक भागापासून ते स्वयंमूल्यमापनपाठापर्यंत चढत्या क्रमाने दहा पाय-यांचा समावेश होतो हे पुढील आकृतीवरून दिसून येईल.

10 स्वयं मूल्यमापन पाठ

9 सहाध्यायी पर्यवेक्षित सरावपाठ

8 चाचणी पाठ

7 सराव पाठ (शिक्षक मार्गदर्शनाखाली)

6 सरावपाठ (प्राध्यापक शिक्षक संयुक्त मार्गदर्शन)

5 अभिरूप अध्यापन

4 पाठनियोजन प्रभुत्वासाठी प्रशिक्षण

3 विविध अध्यापन पद्धती दिग्दर्शन

2 अप्रगत कौशल्य निदान व सूक्ष्म अध्यापन

पायरी 1 सैद्धांतिक भगाचा अभ्यास.

आकृती 1 : प्रशिक्षणमिती [9]

आधार : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, बी. एड्. विद्यार्थी मार्गदर्शिका पृष्ठ 10.

पायरी 1 सैद्धांतिक भागाचा अभ्यास :

सैद्धांतिक भागामध्ये सर्व पाठयक्रमांतील सर्वसाधारण तत्वे, माहिती, संकल्पना, याची माहिती दिलेली आहे.

पायरी 2 अप्रगत कौशल्य : निदान व सूक्ष्म अध्यापन :

उद्बोधनानंतरच्या पहिल्या संपर्कसत्रात अप्रगत कौशल्यांचे निदान करून सूक्ष्म-अध्यापन प्रशिक्षण दिले जाते.

पायरी 3 : विविध अध्यापन पद्धतींच्या पाठांचे दिग्दर्शन :

दुस-या संपर्कसत्रात विविध अध्यापन पद्धती विद्यार्थ्यांनी आत्मसात करण्यासाठी मार्गदर्शक प्राध्यापकांच्या दिग्दर्शित पाठांचे आयोजन केले जाते. सर्व विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभूती येण्यासाठी पाठ निरीक्षण करणे अनिवार्य असते.

पायरी 4 : पाठनियोजन प्रभुत्व प्रशिक्षण :

पाठनियोजन कृतीसत्राचे आयोजन केले जाते. त्याद्वारे निवडलेल्या घटकांचा परिपूर्ण पाठ आराखडा तयार करण्याच्या कौशल्याचा विकास करण्याचा उद्देश असतो.

पायरी 5 : अभिरूप अध्यापन :

**पाठनियोजन प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी अभिरूप अध्यापनाचे आयोजन केले जाते.** अभिरूप अध्यापनातून प्रत्याभरणाच्या द्वारे सुधारणा होण्यास संधी मिळते.

तीन सत्रात चालणा-या कार्यक्रमांचे वेळापत्रक परिशिष्ट ( अ ) मध्ये जोडले आहे.

पायरी 6 व 7 सरावपाठ :

सरावपाठ हे प्रशिक्षणार्थींनी स्वतःच्या शाळेत घ्यावयाचे असतात. मुक्त विद्यापीठाने मान्यता दिलेल्या जेष्ठ प्रशिक्षित विषय शिक्षकांनी या सरावपाठांचे निरीक्षण करावयाचे असते. या सरावपाठांची पाहाणी करण्यासाठी अभ्यासकेंद्रावरील तज्ज्ञांनी मधून मधून उपस्थित राहून मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा आहे. सरावपाठांची संख्या बारा असते.


पायरी 8 : चाचणीपाठ :

सरावपाठानंतर विद्यार्थ्यांनी अध्यापनपद्धती आत्मसात करून परिणामकारकरित्या वापराची चाचणी केंद्रावर जाऊन, तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली व केंद्राने आयोजित केलेल्या ठिकाणी दोन चाचणीपाठ घेऊन द्यावयाची असते.

पायरी 9 : सहाध्यायी पर्यवेक्षित सरावपाठ ( स. प. स ) अध्यापन प्रभुत्वाची खात्री पटल्यानंतर त्या अध्यापनपद्धती दैनंदिन अध्यापनाचा एक कायमस्वरूपी भाग व्हावा म्हणजे संक्रमण व्हावे यासाठी खास स्वरूपाचे प्रशिक्षण अनुभवातून जावे लागते. त्यालाच सहाध्यायी पर्यवेक्षित सराव असे म्हणतात. या स. प. स. मध्ये सहा पाठ स्वतःच्या शाळेत सहाध्यायांच्या निरीक्षणाखाली घ्यावे लागतात. अध्यापनानंतर संक्रमण संदर्भात पाठ घेणारा व सहाध्यायी चर्चा करतात. त्यातून प्रत्याभरण होते आणि प्रशिक्षणाचे संक्रमण खालील आकृती 2 दाखविले आहे. येथे सरावपाठापेक्षा वास्तव परिस्थिती असते.

पायरी 10 : स्वयंमूल्यमापन पाठ :

अध्यापन पद्धतीवरील प्रभुत्व पाहण्यासाठी दहा पाठ घ्यावे लागतात व त्यांचे स्वयंमूल्यमापन करावे लागते.




आकृती - 2 प्रशिक्षणाचे संक्रमण

## संदर्भ


1. सी. पी. कदम, एस्. टी. शेटे — शिक्षणातील विचार प्रवाह सातारा, समर्थ प्रकाशन, मार्च 1993, पृ. 170.
2. ह. ना. जगताप — शिक्षणातील नवप्रवाह व नवप्रवर्तने, पुणे, नूतन प्रकाशन, ऑक्टोबर 1995, पृ.178
3. स्वप्ना वोराह — डिस्टन्स एज्युकेशन, दिल्ली, अमर प्रकाशन, 1987, पृ. 81
4. कित्ता, पृ.82
5. कित्ता, 20
6. कित्ता, पृ. 176.
7. बी. एड्. मार्गदर्शिका — नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 1999, पृ. 26
8. राम ताकवले, — " कुलगुरूंचे मनोगत " शिक्षणाचे अधिष्ठान, तात्विक, सामाजिक व सांस्कृतिक, ( नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ) प्रकाशन, 1992.
9. बी. एड्. मार्गदर्शिका — नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 1999. पृ. 10
10. कित्ता पृ. 11
11. कित्ता, पृ. 12.